ISSN–2278-5655

Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XI, Issue– V Sep – Oct, 2022

OPEN ACCESS Original Research Article

संस्थेतील वातावरण जेवढे चांगले तेवढा सकारात्मक प्रभाव प्रशिक्षकांच्या बोधात्मक शैलीवर होतांना दिसून येतो. त्यानुसार प्रशिक्षकांच्या स्व प्रतिष्ठाही स्पष्ट होताना दिसतात.

**संशोधनाची गरज:**

प्रत्येक व्यक्तीच्या जीवनात गुरुचे स्थान महत्त्वाचे असते. प्राचीन काळी गुरुकुल पद्धतीचा अशा पद्धतीने ज्ञानदानाचे कार्य निस्वार्थीपणे केले जात असे. इंग्रजांच्या राजवटीत शिक्षणास व्यवसायिक स्वरूप प्राप्त झाल्यावर अध्यापनाच्या कामकाजाकरीता शिक्षकांच्या नियुक्त्या करण्यास सुरुवात झाली. शिक्षकाची नोकरी ज्यांना अध्यापनाच्या कार्यात अभिरुची आहे, ते स्वीकारीत असे.

स्वातंत्र्यनंतरच्या काळात शिक्षण हे सर्वांना सक्तीचे करण्यात आल्यामुळे शिक्षण देणाऱ्या प्राथमिक, माध्यमिक शाळांच्या संस्थेत व अध्यापनाच्या कामासाठी आवश्यक शिक्षकांच्या संस्थेतही वाढ होऊ लागली. बहुतांशी शिक्षकांचा उदरनिर्वाहाचा मार्ग म्हणून शिक्षकी पेशा स्वीकारण्याची वृत्ती वाढू लागली. त्यामुळे केवळ अध्यापन हे एक कामकाजा चा भाग म्हणून पाहणारे शिक्षक आपल्या कार्यात समाधानी असतीलच असे नाही.

**संशोधन समस्या विधान:**

शिक्षक प्रशिक्षकांच्या बोधात्मक शैलीच्या अनुसार स्व प्रतिष्ठा आणि संघटनात्मक वातावरण यांच्या सहसंबंधाचा अभ्यास.

**संशोधनाची चले:**

**स्वतंत्र चले:** बोधात्मक शैली, संघटनात्मक वातावरण

**परतंत्र चले:** स्वप्रतिष्ठा

**संशोधनाची ध्येय**: शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील शिक्षक प्रशिक्षकांचे बोधात्मक शैलीच्या अनुसार स्व प्रतिष्ठा आणि संघटनातील वातावरण यांच्या सहसंबंधाचा अभ्यास करणे.

**संशोधनाची उद्दिष्टे:**

१. शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील शिक्षक प्रशिक्षकांच्या खालील बोधात्मक शैलीच्या प्रकारांचा अभ्यास करणे.

  अ . पद्धतशीर शैली

  ब . सहज ज्ञान शैली

  क. एकात्मिक शैली

  ड. विभिन्न शैली

  इ. विभाजन शैली

२. शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील शिक्षक प्रशिक्षकांच्या बोधात्मक शैली अनुसार त्यांच्या स्वप्रतिष्ठेचा सहसंबंधचा अभ्यास करणे.

ISSN–2278-5655

Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

*Volume–XI, Issue– V* *Sep – Oct, 2022*

OPEN ACCESS Original Research Article

३. शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील शिक्षक प्रशिक्षकांच्या बोधात्मक शैली अनुसार त्यांच्या संघटनात्मक वातावरणातील सहसंबंधाचा अभ्यास करणे.

४. शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील शिक्षक प्रशिक्षकांच्या स्वप्रतिष्ठा व संघटनात्मक वातावरणाच्या सहसंबंधाचा अभ्यास करणे.

५. शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील शिक्षक प्रशिक्षकांच्या बोधात्मक शैली अनुसार स्व प्रतिष्ठा आणि संघटनात्मक वातावरण यांच्यासह संबंधाचा अभ्यास करणे.

**संशोधनाची परिकल्पना:**

१. शिक्षणशास्त्र महाविद्यालयात शिक्षक प्रशिक्षकांच्या बोधात्मक शैली व त्यांच्या स्वप्रतिष्ठेत लक्षणीय सहसंबंध नाही.

२. शिक्षणशास्त्र महाविद्यालयात शिक्षक प्रशिक्षकांच्या बोधात्मक शैली व संघटनात्मक वातावरणात लक्षणीय सहसंबंध नाही.

३. शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील शिक्षक प्रशिक्षकांची स्वप्रतिष्ठा व संघटनात्मक वातावरणात लक्षणीय सहसंबंध नाही.

४. शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील शिक्षक प्रशिक्षकांच्या बोधात्मक शैलीच्या अनुसार स्वप्रतिष्ठा आणि संघटनात्मक वातावरण यांच्यात लक्षणीय संबंध नाही.

**संशोधनाची व्याप्ती:**

शिक्षण प्रशिक्षण देणाऱ्या प्रशिक्षण महाविद्यालयाशी संबंधित आहे. ही प्रशिक्षण महाविद्यालय मुंबई विद्यापीठाशी संलग्न असलेली आहे. मराठी हिंदी व इंग्रजी माध्यम असलेल्या शिक्षणशास्त्र महाविद्यालय निवडली होती. शिक्षक प्रशिक्षकांची स्वप्रतिष्ठा व संघटनात्मक वातावरणाचा अभ्यास केला.

**संशोधनाची कार्यपद्धती:** सदर संशोधनासाठी संशोधीकेने वर्णनात्मक पद्धतीचा वापर केला.

**संशोधनाचा न्यादर्श:** प्रस्तुत संशोधनात संशोधीकेने मुंबई विद्यापीठाशी, विद्यापीठांतर्गत संलग्न असलेल्या शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील २५३ शिक्षक प्रशिक्षकांचा समावेश केला.

**निष्कर्ष:**

१. शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील शिक्षक प्रशिक्षकांच्या बोधात्मक शैली व स्वप्रतिष्ठा यात ०. ०५स्तरावर सहसंबंध दिसून येतो.

२. शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील शिक्षक प्रशिक्षकांच्या बोधात्मक शैली व संघटनात्मक वातावरणत ०. ०५ स्तरावर सहसबंध दिसून येतो.

३. शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील शिक्षक प्रशिक्षकांची स्वप्रप्रिष्ठा व संघटनात्मक वातावरणात ०. ०५ स्तरावर सहसबंधसंबंध नाही.

४. शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील शिक्षक प्रशिक्षकांच्या बोधात्मक शैली अनुसार स्वप्रतिष्ठा व संघटनात्मक वातावरण यामध्ये सहसंबंध दिसून येतो.

ISSN–2278-5655

Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XI, Issue– V | Sep – Oct, 2022

OPEN ACCESS | Original Research Article

**समारोप:**

थोडक्यात बोधात्मक शैलीच्या आधारे स्वप्रतिष्ठा जपण्यासाठी मदत होऊ शकते. संस्थेतील संघटनात्मक वातावरणाने इतरांप्रती जागृत राहण्याची स्वतःची जबाबदारी पार पाडण्यास मदत होते. त्याचप्रमाणे योग्य प्रकारे नियोजन, संघटन व नियंत्रण हे बोधात्मक शैलीच्या प्रकारानुसार कामाची विभागणी करण्यास मदत होते.

संबंधित वातावरणात समायोजन साधण्यासाठी व्यक्तीच्या स्वप्रतिष्ठेचा अभ्यास उपयोगी ठरू शकतो. व्यक्तीची इतरांप्रती भावना स्वकृतिशीलवृत्ती, कामाची तत्परता हे संघटनेतील वातावरण चांगले असल्यास टिकते. यासाठी शासनाला शैक्षणिक संघटना व त्या संघटनेतील वातावरण सुदृढ राहण्यासाठी विविध योजना राबविण्यास मदत होते.

**संदर्भ सूची:**

भाग्यवंत,सु . (२००९ऑक्टो-नोव्हें.). अध्ययन शैली नुसार अध्यापन शिक्षण समीक्षा. पान नं. १०७.

मोरे, च .,भालेगावकर. (२००८ सप्टें.). शिक्षक शिक्षण: नित्य नूतन प्रकाशन, पुणे., पान नं . ७

मायगोंडा, म.(२०१० मे. ). संघटनात्मक वातावरण आणि नेतृत्व वर्तन विकास. भारतीय शिक्षण पान नं . ४१

शिंदे. मा.,(२००९ ऑक्टो-नोव्हें.). शिक्षक शिक्षणांची सद्यस्थिती एक चिंतन . शिक्षण समीक्षा पान नं. १२७

***Cite This Article:***

** **श्रीम. अर्चना आत्माराम भोपळे आणि ** डॉ. सुधा समीर पिंगळे** (2022).* **शिक्षक प्रशिक्षकांच्या या बोधात्मकशैली अनुसार स्वप्रतिष्ठा आणि संघटनात्मक वातावरण यांच्या सहसंबंधाचा अभ्यास,** *Aarhat Multidisciplinary International Education Research Journal, XI (V) Sep – Oct, 96 -99.*